# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad

Date: 08 October 2023

Time: 7.10 AM to 7.25 AM

Language Marathi

**आकाशवाणी औरंगाबाद**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०८ ऑक्टोबर २०२३ सकाळी ७.१० मि.**

****

- काकवीवरील जीसएटीत कपात तर बाजरी पीठाचा समावेश असलेलं सुटं पीठ करमुक्त
- राज्याच्या सर्व जिल्ह्यात बांबू लागवडीसाठी अनुदान देण्याचा प्रयत्न- कृषीमंत्री धनंजय मुंडे
- डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या केंद्रीय युवक महोत्सवाचा समारोप
- आशियाई क्रीडा स्पर्धेत २८ सुवर्णांसह एकशे सात पदकं जिंकत भारताची ऐतिहासिक कामगिरी
  आणि
- एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताची आज ऑस्ट्रेलियासोबत लढत

****

काकवीवरील वस्तू आणि सेवा कर २८ टक्क्यांवरून पाच टक्के तर ७० टक्के बाजरी पीठाचा समावेश असलेलं सुटं पीठ करमुक्त करण्यात आलं आहे, माहिती छापलेल्या पाकीटबंद पिठावर मात्र पाच टक्के जीएसटी आकारला जाईल. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल नवी दिल्लीत वस्तू आणि सेवा कर - जीएसटी परिषदेच्या ५२ व्या बैठकीनंतर ही माहिती दिली. शासकीय संस्थांना होणारा पाणी पुरवठा, स्वच्छता, आरोग्य सेवा, तसंच घनकचरा व्यवस्थापनाला जीएसटीतून सूट देण्याची शिफारस परिषदेनं केली आहे. रेल्वेमध्ये पुरवल्या जाणाऱ्या

वस्तू तसंच सेवांवर फॉरवर्ड चार्ज पद्धतीने कर आकारावा, जेणेकरून या सेवांवर इनपुट टॅक्सचा लाभ घेता येईल, असंही परिषदेनं सुचवलं आहे. जीएसटी लवादाच्या अध्यक्षांची वयोमर्यादा ६७ वर्षांवरून ७० वर्ष करण्यात आल्याची माहितीही सीतारामन यांनी दिली.

****

राज्याच्या सर्व जिल्ह्यात बांबू लागवडीला अनुदान देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं, कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितलं आहे. ते काल लातूर जिल्ह्यात लोदगा इथं फिनिक्स फाउंडेशनच्या कृषी महाविद्यालय, बांबू टीश्यू कल्चर, बांबू फर्निचर प्रकिया उद्योगाला भेट दिल्यानंतर बोलत होते. बांबू हे पिक मातीचे आरोग्य वाढवणारं असल्यान लातूर आणि सातारा इथं प्रायोगिक तत्वावर होणारी बांबू लागवड आता बीड जिल्ह्यातही केली जाणार असल्याचं, मुंडे यांनी यावेळी सांगितलं. राज्याचा कृषी विभाग आता माती परीक्षणावर अधिक भर देणार असून, यासाठी टपाल कार्यालयाची मदत घेतली जाणार असल्याची माहिती मुंडे यांनी दिली.

****

छत्रपती संभाजीनगर इथं उभारलेलं सुपर स्पेशालिटी रुग्णालय येत्या पाच नोव्हेंबर पर्यंत सुरू करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठानं दिले आहेत. या रुग्णालयाच्या खासगीकरणाचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत, खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी या संदर्भात एक जनहित याचिका खंडपीठात दाखल केली होती, त्या सुनावणीदरम्यान न्यायालयानं या रुग्णालयात आवश्यक कर्मचारी भरती २८ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून वैद्यकीय सेवा पाच नोव्हेंबरपर्यंत सुरू करण्याचे निर्देश दिले, याबाबत खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी अधिक माहिती दिली…

**"हायकोर्टाने गंभीर दखल घेतली आणि निर्णय दिला की २८ ऑक्टोबरपर्यंत तुमची जी काही ऑफिशियल प्रक्रिया आहे ती प्रक्रिया पूर्ण करा. एक नोव्हेंबर ते चार नोव्हेंबरपर्यंत सगळ्या नर्सेसची पोस्टींग इथे करून द्यावी. म्हणजे पाच तारखेपासून इथे आपण सगळं ऑपरेशन्स करू शकेल."**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय घाटीतल्या आरोग्य यंत्रणेतल्या त्रुटींसंदर्भातही सय्यद इम्तियाज यांनी याचिका दाखल केली होती, त्यावर न्यायालयानं त्यांनाच सरकारी वकिलांच्या सोबत घाटीची पाहणी करण्यास सांगितलं होतं. काल खासदारांनी पाहणी केली असता, पूर्वी अस्वच्छ असलेली ठिकाणं स्वच्छ दिसून आल्याचं त्यांनी सांगितलं.

****

नांदेड इथल्या शासकीय रुग्णालयात पाच ऑक्टोबर ते सहा ऑक्टोबर या २४ तासाच्या कालावधीत सहा जणांचा मृत्यू झाला तर १६५ रुग्ण बरे होऊन घरी गेले. अतिगंभीर रुग्णांचा मृत्यू दर शून्य पूर्णांक सात टक्क्याहून कमी असल्याचं जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सांगितलं. जिल्हा प्रशासनाने रुग्णालयाला औषधी आणि यंत्रसामुग्रीसाठी अतिरिक्त प्रशासकीय मान्यता दिली असून अतिरिक्त मदतीसाठी खाजगी डॉक्टर्स आणि परिचारिका उपलब्ध करून दिल्याचं राऊत यांनी सांगितलं.

****

जालना जिल्हा प्रशासनाकडून कोतवाल पदासाठी घेण्यात येत असलेल्या परीक्षेचा पेपर फुटल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जालना शहरातल्या एका परीक्षा केंद्रावरून पेपर लिहिण्यासाठी इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसचा वापर करणाऱ्या तीन संशयितांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरात चार तारखेपासून सुरू झालेल्या केंद्रीय युवा महोत्सवाचा प्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर आणि अभिनेते प्रवीण डाळींबकर यांच्या उपस्थितीत काल समारोप झाला. देवगिरी महाविद्यालयाच्या संघानं सोळा पारितोषिकांसह संगीत विभागाची ढाल आणि सर्वोत्कृष्ट संघाचं विजेतेपद पटकावलं. विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागाच्या संघानं दहा पारितोषिकांसह ललित कला गटाची ढाल पटकावली, तर ग्रामीण गटात सर्वोत्कृष्ट संघाचं विजेतेपद कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयानं पटकावलं.

****

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं आजवरची सर्वाधिक विक्रमी एकशे सात पदकं जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. एकूण २८ सुवर्ण, ३८ रौप्य आणि ४१ कांस्य पदकं जिंकत भारत या स्पर्धेच्या पदकतालिकेत चौथ्या स्थानावर कायम आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्व खेळाडूंशी १० तारखेला संवाद साधणार आहेत.

काल या स्पर्धेच्या १४ व्या दिवशी कबड्डी स्पर्धेत भारताच्या पुरुष आणि महिलांच्या संघांनी सुवर्णपदक पटकावलं. तीरंदाजीच्या कंपाउंड प्रकारात वैयक्तिक स्पर्धेत भारताच्या ज्योती सुरेखा तसंच ओजस देवतळेनं सुवर्णपदक पटकावलं. याच प्रकारात अभिषेक वर्माने रौप्य पदक तर आदिती गोपीनाथ हिने कांस्यपदक पटकावलं. ज्योती तसंच ओजस दोघांचही हे तिसरं सुवर्ण पदक आहे. बॅडमिंटन दुहेरीत चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज कोरीयाचा पराभव करत सुवर्णपदक जिंकलं. तर क्रिकेट मध्ये अफगाणिस्तानविरुद्धचा अंतिम सामना पावसामुळे थांबवावा लागला, मात्र, भारतीय पुरुष क्रिकेट संघाला वेगवान धावसंख्येमुळे सुवर्णपदक देण्यात आलं.

महिला हॉकी संघानं जपानला हरवत कांस्य पदक जिंकलं. मल्ल दिपक पूनिया ने ८६ किलो वजनी गटात फ्रिस्टाईल कुस्ती मध्ये रौप्य पदक पटकावलं. बुद्धिबळ स्पर्धेत पुरूष तसंच महिला संघांनी रौप्य पदक पटकावलं.

तीरंदाजीत तीन सुवर्ण पदक जिंकणारा ओजस हा नागपुरचा रहिवासी असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांनी त्याचं अभिनंदन केलं आहे. ओजसच्या आई अर्चना देवतळे यांनी आकाशवाणीशी बोलताना या शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या....

***“पूर्ण फॅमिली आणि एरियातील लोकं सुद्धा खूप खूश आहेत. ढोल ताशे लावून त्यांनी पूर्ण एन्जॉय केला त्याला गोल्ड मेडल मिळाल्यावर. सातवीपासून त्याने शिकायला सुरूवात केली होती. पण जसं तो दहावीत आला आणि त्याचं त्या गेमविषयी समर्पण पाहिलं, त्याची जिद्द पाहिली, चिकाटी पाहिली. त्याचं कॉन्स्नट्रेशन आणि बारा–बारा तास ती प्रॅक्टीस करणं, मग तेव्हापासून ठरवलं की नाही त्याला आता आपण सपोर्ट करायचा.”***

****

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा पहिला सामना ऑस्ट्रेलियासोबत होणार आहे. चेन्नइ इथं एम ए चिदम्बरम मैदानावर दुपारी दोन वाजता या सामन्याला सुरुवात होईल. काल झालेल्या दोन सामन्यात बांगलादेशनं अफगाणिस्तानचा तर दक्षिण आफ्रिकेनं विश्वचषकातली उच्चांकी ४२८ धावसंख्या उभारून श्रीलंकेचा १०२ धावांनी पराभव केला.

****

बीड इथं पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी काल विविध विकास कामांची आढावा बैठक घेतली. पाणीटंचाई, चारा टंचाई, भूमी अधिग्रहण, थेट लाभ हस्तांतरण, आदी विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांच्या स्थितीचाही मुंडे यांनी आढावा घेतला.

****

साडे तीनशेव्या शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त विश्व हिंदू परिषदेच्या वतीनं काढण्यात आलेल्या शौर्य जनजागरण यात्रेचं काल धाराशिव इथं स्वागत करण्यात आलं. टाळ आणि संबळच्या नादात निघालेल्या या यात्रेत वारकरी, विद्यार्थी, नागरिक, मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

****

नांदेड पोलिसांनी काल एक गावठी पिस्तुल आणि मॅग्जीन जप्त केलं. या प्रकरणी एकास अटक करण्यात आली असून, न्यायालयानं त्याला सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या गेवराई तालुक्यातील चकलंबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत, पोलीस पथकानं वाळूच्या अवैध साठ्यावर छापा टाकून ५०० ब्रास वाळूसह ८० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या पथकानं ही कारवाई केली.

****

वीज महावितरण कंपनीच्या छत्रपती संभाजीनगर इथल्या वाळूज महानगर शाखेने सप्टेंबर महिन्यात एक लाख ३७ हजार रुपयांची वीजचोरी उघडकीस आणली होती. या प्रकरणी आठ जणांविरोधात वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

नांदेड-तांदूर एक्स्प्रेस रेल्वे आता कर्नाटकातील रायचूर रेल्वे स्थानकापर्यंत धावणार आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागीय कार्यालयाकडून ही माहिती देण्यात आली.

****